दिनांक : २२.०५.२०२१

# माधवी ओगले व्यावसायिक शाळा
# वार्षिक अहवाल २०२० - २०२१

शाळेत एकूण विद्यार्थी १६, शिक्षक ३, मावशी व काका ४ कार्यरत आहेत.

कोवीड-१९ या संसर्गजन्य आजाराच्या प्रार्दुभावामुळे सरकार नियमांनुसार विद्यार्थ्यासाठी शाळा बंद ठेवण्यात आली होती, जरी शाळा प्रत्यक्ष सुरू करणे शक्य झाले नाही तरी ऑनलाइन शाळा सुरू करण्यात आली होती.

माधवी ओगले व्यावसायिक शाळेच्या मुख्याध्यापिका कलिका मुजुमदार यांनी मुख्याध्यापिका पदाचा राजीनामा दिल्यामुळे ट्रस्ट व संचालिका सौ.हर्षा मुळे यांनी ठरविल्याप्रमाणे शाळेचे कामकाज स्वाती सगम पाहतील त्याप्रमाणे त्या काम पाहत आहेत.

ISO Google meet

- दि.२९.१०.२०२० रोजी Internal Audit झाले.
- दि. २२.१२.२०२० रोजी Surveillance Audit झाले.

फी

- कोविड-१९ या समस्येमुळे शैक्षणिक वर्षे २०२०-२०२१ साठी ची फी रू. ५३,000/- ऐवजी रू. ४0,000/- करण्यात आली होती.
- अनेक पालकांनी आपल्या पाल्यास हया संपूर्ण वर्षासाठी शाळेत पाठविणार नसल्याचे सांगितले आहे. तरी त्यांनी शैक्षणिक वर्ष २०२० - २०२१ साठी प्रवेश कायम ठेवण्यासाठी रू. ५000/- फी भरण्यास सांगितले आहे.

शिक्षक

- यावर्षी कोविड १९ समस्येमुळे २०२० - २०२१ यावर्षा साठी उरर्वरित शिक्षकांनी आपला रजेचा अर्ज दिला आहे. जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर २०२० या महिन्यात आठवडयातून दोन दिवस विमल शिंदे व राधा पूर्णपात्रे या शिक्षिकानी कामाच्या गरजेप्रमाणे कार्यशाळेत येवून काम केले.

अभ्यासक्रम

- सर्व विद्यार्थ्यांना ई-मेल व WhatsApp Online Group व्दारे अभ्यासक्रम व सूचना पाठविण्यात येत होत्या .
- विद्यार्थ्यांचे ABT सेशन्स विद्या भागवत यांनी घेतले .

उपक्रम

- दि . २१ जून २०२० रोजी ऑनलाईन पध्दतीने योगा दिनाविषयी माहिती देवून व व्यायाम करण्यास सांगण्यात आले होते .
- टिळक पुण्यतिथी निमित्त विद्यार्थ्यांची प्रश्नमंजुषा घेण्यात आली होती .
- रक्षाबंधना निमित्त रांगोळीचा सराव करून घेण्यात आला होता .
- १५ ऑगस्ट रोजी संस्थेत झेडावंदन करण्यात आले .
- दि . ०२ ऑटोंबर २०२० रोजी महात्मा गांधी जयंती आणि भूतपुर्व प्रधानमंत्री लाल बहादुर शास्त्री जंयती निमित्त 'घरातील स्वच्छता' हा उपक्रम विद्यार्थ्यांना सांगण्यात आला होता . सर्वानी छान प्रतिसाद दिला .
- दि . १५ऑक्टोंबर २०२० रोजी भूतपुर्व राष्ट्रपती डॉ . अब्दुल कलाम यांच्या जन्मदिना निम्मित्त वाचन दिन साजरा करण्यात आला .
- शाळेत खंडेनवमी निम्मित साहित्य पुजा करण्यात आली .
- दि . २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिना निमित्त विद्यार्थ्यांनी ऑनलाईन समूह गायन व कवायत प्रकार सादर करण्यात आले .
- दरवर्षी प्रमाणे 'आनंदमेळा' म्हणजेच आईस्क्रीम पार्टी दि . १९ . ०४ . २०२१ रोजी Zoom link पाठवून सर्वांनी पार्टीचा आनंद घेतला .

स्नेहसंमेलन

- यावर्षी लार्क व एम . ओ . व्ही . एस या दोन्ही शाळेचे एकत्र स्नेहसंमेलन करण्याचे ठरविण्यात आले . त्यासाठी 'स्वप्नानंद' हा विषय ठरविण्यात आला होता .

  दि . ०२ . ०३ . २०२१ रोजी काही कार्यक्रमांचे शाळेत shooting करण्यात आले . काही कार्यक्रमाचे video पालकांना करून पाठविण्यास सांगितले होते . त्यासाठी पालकांना शिक्षकांनी नाचाचे व्हिडीओ करून पाठविले होते .
- दि . २० . ०३ . २०२१ रोजी लार्क व एम . ओ . व्ही . एस च्या पालकांना स्नेहसंमेलनाची Zoom link पाठविण्यात आली होती . zoom link ला add होवून एकूण ५८ व्यक्तींनी कार्यक्रमाचा आनंद घेतला . शाळेत शिक्षकांना सर्व स्नेहसंमेलन zoom link व्दारे प्रोजेक्टर वर दाखविण्यात आले .

परिक्षा

- तिमाही, सहामाही, नऊमाही व वार्षिक परिक्षा online पध्दतीने घेण्यात आली .
- परिक्षेचे निकाल WhatsApp व्दारे पालकांना पाठविण्यात आले . वार्षिक परिक्षेच्या निकालापूर्वी व्यक्तिगत व्हिडीओ कॉलव्दारे पालकांशी चर्चा करण्यात आली . वर्षभराच्या ऑनलाइन शिक्षणामुळे पालक समाधानी आहेत .

बाहेरील स्पर्धा

- दि. ७ ऑक्टोंबर २0२0 रोजी सोहाम योग केद्रा तर्फे घेण्यात आलेल्या योग स्पर्धेत रोहन गिरे या विद्यार्थ्याने सहभाग घेतला होता.

उत्पादन विभाग

- मागील वर्षीच्या शिल्लकीत असलेल्या सामानाची विक्री केली.
  शिवण विभागातील भाजीच्या पिशव्या, टोमॅटो व चिंच सॉस
- गुरूकुल शाळेची फाईल्स्च्या ऑर्डर पूर्ण करून देण्यात आल्या.
- द्रोण बनविण्याचे काम प्रायोगिक तत्त्वावर करून पाहण्यात आले.
- मागणीनुसार चिंच सॉस करणे चालू आहे.

कार्यशाळा विभाग

- किचन विभागातील सर्व वस्तूंची साफ सफाई करून घेण्यात आली.
- कॅन्टिन मध्ये स्नॅक्सचे उत्पादन नेमके किती होते. हे पाहण्यासाठी धान्य मोजून स्नॅक्स करून पाहण्यात आला. त्याचे डीश प्रमाणे मोजमाप करण्यात आले. वर्षभर एकूण वस्तूंचे उत्पादन किती होते, खर्च व नफा किती होतो. यासाठी पध्दत घालण्याच्या कामास सुरूवात करण्याचे आयोजिले आहे. यासाठी विद्या भागवत यांनी मार्गदर्शन केले.
- शिवण काम विभागातही जुन्या पासून नवीन वस्तू तयार करण्याचे काम करण्यात आले. काही अतिरिक्त असलेले कपडे अनाथ आश्रमच्या मुलांना देण्यात आले.
- कॅन्टिनच्या पुर्नरचना करण्याचे कामकाज सुरू आहे.

पालक मिटिंग

- दि.0८.0९.२0२0 रोजी पालकसभा घेण्यात आली. यावेळी पालकांशी संचालिका हर्षा मुळे यांनि संवाद साधला.
- दि. 0७.0१.२0२१ रोजी ऑफलाईन व ऑनलाईन विद्यार्थ्यांच्या पालकांची सभा घेण्यात आली होती. फेब्रुवारी महिन्यात शाळा सुरू करण्याबाबत पालकांशी चर्चा केली, त्याबाबत पालकांनी त्यांची मते लेखी स्वरूपात शाळेला कळविली आहे. तसेच पालकांकडून Feedback form भरून घेण्यात आले.
- दि. 0१.0३.२0२१ रोजी zoom मिटिंग व्दारे स्नेहसंमेलना संदर्भात सभा घेण्यात आली.

स्वाती सगम
माधवी ओगले व्यावसायिक शाळा